:: प्रसिध्दी पत्रक :: दिनांक :- ०२.०३.२०२३

आरोपी लोकसेवक - श्री. रविंद्र दत्तात्रय अंदाने, वय ५५ वर्ष, पद - तलाठी, सज्जा सावरगाव अतिरीक्त कार्यभार केमवाडी, ता. तुळजापुर जि. उस्मानाबाद रा. गणपती मंदीर जवळ, ६२ वसंत नगर, विजापुर रोड सोलापुर जि. सोलापुर ( खाते -महसुल, वर्ग - ३)

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | उस्मानाबाद |
| पो. स्टे. गुन्हा नोंद व कलम | पोलीस ठाणे, तामलवाडी ता. तुळजापुर जि. उस्मानाबाद<br>गु.र.नं - ३०/२०२३ कलम ७ भ्र प्र अधि. सन १९८८ |
| आलोसेचे नाव, हद्दा व पत्ता | श्री. रविंद्र दत्तात्रय अंदाने, वय ५५ वर्ष, पद - तलाठी, सज्जा सावरगाव अतिरीक्त कार्यभार केमवाडी, ता. तुळजापुर जि. उस्मानाबाद रा. गणपती मंदीर जवळ, ६२ वसंत नगर, विजापुर रोड सोलापुर जि. सोलापुर ( खाते -महसुल, वर्ग - ३) |
| लाच मागणी रक्कम | १५,०००/- रूपये |
| लाच स्विकृती रक्कम | १०,०००/- रूपये |
| तपास अधिकारी | प्रशांत संपते, पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांच्या मालकीच्या शेत जमीनीची रजिष्टरी नोटरी केलेल्या संमतीपत्राआधारे पत्नी व मुलगा यांचे नावे फेरफारला (खातेफोड) नोंद घेणेसाठी. |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी त्यांचे नावावर असलेल्या केमवाडी शिवारातील शेतगट नं. ३४१ मधील क्षेत्र २ हेक्टर ८३ आर. पैकी १ हेक्टर पत्नी शिला राऊत व एक हेक्टर मुलगा अभिषेक राऊत यांचे नावे रजिष्टरी नोटरी करून संमतीपत्र लिहुन दिले होते. त्या आधारे पत्नी शिला व मुलगा अभिषेक यांचे नावे फेरफारला (खातेफोड) नोंद घेणेसाठी आलोसे श्री. अंदाने, तलाठी हे तक्रारदार यांचेकडे १५,०००/- रूपये लाचेची मागणी करत असल्याने व त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथे तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरून केलेल्या पडताळणी दरम्यान आलोसे श्री. अंदाने, तलाठी यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे कामासाठी पंच साक्षीदारा समक्ष १५,०००/- रूपये लाचेची मागणी करून १०,०००/- रूपये स्विकारण्यास संमती दर्शविल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे आज दि. ०२/०३/२०२३ रोजी सापळा आयोजीत केला असता आलोसे श्री. रविंद्र दत्तात्रय अंदाने, वय ५५ वर्ष, पद - तलाठी, सज्जा सावरगाव अतिरीक्त कार्यभार केमवाडी, ता. तुळजापुर जि. उस्मानाबाद<br>( खाते -महसुल, वर्ग - ३) यांनी तक्रारदार यांचेकडुन १०,०००/- रूपये लाच रक्कम पंच साक्षीदारा समक्ष मंडळ अधिकारी कार्यालय, सावरगाव ता. तुळजापुर जि. उस्मानाबाद येथे स्विकारल्याने त्यांना लाचेच्या रकमेसह ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचे विरूध्द पोलीस ठाणे तामलवाडी येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

सदरची कारवाई मा. संदीप आटोळे, पोलीस अधीक्षक, लाप्रवि औरंगाबाद, मा. विशाल खांबे, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि औरंगाबाद मार्गदर्शनाखाली प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक व पोलीस अंमलदार इफ्तेकार शेख, दिनकर उगलमुगले, विष्णु बेळे, जाकेर काझी लाप्रवि उस्मानाबाद युनिट यांनी केली आहे.

Scanned with CamScanner

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबधी माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद यांचेशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| **संपर्क पत्ता** | **:- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद.** |
| **संकेतस्थळ** | **:- १. acbwebmail@mahapolice.gov.in**<br>**२. dysposmanabad@gmail.com** |
| **ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन** | **:- acbmaharashtra.net** |
| **टोल फ्रि क्रमांक** | **:- १०६४** |
| **दुरध्वनी क्रमांक** | **:- ०२४७२-२२२८७९** |
| **पोलीस अधीक्षक, लाप्रवि, औरंगाबाद** | **:- ९९२३०२३३६१** |
| **अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि, औरंगाबाद** | **:- ८७८८६४४९९४** |
| **पोलीस उप अधीक्षक, लाप्रवि, उस्मानाबाद** | **:- ९५२७९४३१००** |

मा. सविनय सादर.

**(प्रशांत संपते)**
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद

Scanned with CamScanner